सबसे 'तेज' ग्लोबल महातेज...!

Postal Regd. No. JAL/443/2025-2027

# ग्लोबल महातेज

https://epaper.globalmahatej.com/

RNI. NO. MAHBIL /25/A0192

वर्ष १ ले | अंक : २८० | गुरुवार, दि. २ जुलै २०२६ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : ३ रुपये | Email - globalmahatej@gmail.com

**रवि ज्वेलर्स**
सराफ बाजार, अमळनेर.
मो. ७०७४७४२१२१

**सोने-चांदी**
आजचे भाव

२४ Ct सोने ९९.५०% : ₹ १४३०००
२२ Ct सोने ९१.६०% : ₹ १३१०००
१८ Ct सोने ७५.००% : ₹ १०९०००
शुद्ध चांदी ९९९% : ₹ २३००/-
भाव प्रती १० ग्राम






श्री. विजय पाटील
अमळनेर



श्री. चंद्रशेखर वारूळे
अमळनेर

गर्व से कहो स्वदेशी है हम...!
स्वदेशी ही खरिदेंगे हम...!!

स्वातंत्र्यपूर्व संग्रामातील स्वदेशीची हाक आता पुन्हा देवू या. नवरात्रोत्सवात आपण आदिमाया आदिशक्तीचा जागर करतो त्याप्रमाणेच स्वदेशीचाही जागर करूया..! सच्च्या भारतीयांवर जेव्हा-जेव्हा परकीय आक्रमण होते तेंव्हा-तेंव्हा ते प्रचंड त्वेषाने पेटून उठतात...!! आता तीच वेळ येऊन ठेपली आहे...!!!
जय भारत...!
जय स्वदेशी...!!

### शहीद जवानांच्या वारसदारांना मुद्रांक शुल्कातून दिलासा

पान २ वर...

## जल सेवा पंढरपूरकडे मार्गस्थ होणाऱ्या दिंडीतील वारकऱ्यांची..!





अमळनेर : येथील पैलाड भागातून पंढरपूरकडे आषाढी वारीला निघणाऱ्या दिंडीतील वारकऱ्यांना दरवर्षीप्रमाणे बुधवार, दि. १ जुलै रोजी सकाळी मंगळग्रह सेवा संस्थेतर्फे अध्यक्ष डॉ. डिगंबर महाले यांच्या मार्गदर्शनाखाली भाविकांना शुद्ध व थंड पाण्याच्या बाटल्यांचे वाटप करताना उपाध्यक्ष एस. एन. पाटील, खजिनदार गिरीश कुलकर्णी, मंगल सेवेकरी सौ. आशाताई महाले तसेच मंदिराचे सेवेकरी. दुसऱ्या छायाचित्रात निवृत्त एसीपी राजेंद्र भामरे, ॲड. रवींद्र देशमुख, दिलीप देशमुख, अनिलदादा जोशी, महेश कोठावदे, केशव पुराणिक, चेतन राजपूत, किरण पाटील, जितेंद्र ठाकूर, उदय देशपांडे, प्रा. सुधीर पाटील, संजीव ठेकेदार, श्री. घाटी आदींसह वारकऱ्यांसमवेत दिंडी घेऊन पंढरपूरकडे प्रस्थान करताना संत श्री प. पू. प्रसाद महाराज. (छायाचित्रे : नितेश बारी)

### बेवारस मृतदेहाची विल्हेवाट प्रकरण

# ठेकेदार, सुपरवायझरसह घंटागाडी चालकाविरुद्ध गुन्हा दाखल

### स्वच्छता निरीक्षकावरही शिस्तभंगाची कारवाईसाठी जिल्हाधिकाऱ्यांकडे पाठविला प्रस्ताव

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : बेवारस मृतदेहाची घनकचरा संकलनासाठी वापरल्या जाणाऱ्या घंटागाडीतून वाहतूक करण्यात आली. या गाजलेल्या प्रकरणात अखेर पोलीस आणि पालिका प्रशासनाने दुहेरी कारवाईचा बडगा उगारला आहे. या प्रकरणात घनकचरा ठेकेदार, त्याचा सुपरवायझर आणि संबंधित घंटागाडी चालकाविरुद्ध अमळनेर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच बेवारस मृतदेहांच्या विल्हेवाटीची जबाबदारी असलेले पालिकेचे स्वच्छता निरीक्षक संतोष माणिक यांच्याविरुद्ध शिस्तभंग कारवाईचा प्रस्ताव जिल्हाधिकाऱ्यांकडे पाठविण्यात आला आहे.




याबाबत अधिक माहिती अशी, की अमळनेर पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता (बीएनएस) २०२३ मधील कलम २२३ व ३(५) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पालिकेचे स्वच्छता निरीक्षक संतोष कन्हैया जाधव यांनी सरकारतर्फे दिलेल्या फिर्यादीवरून घनकचरा ठेकेदार रामदास बाळू पवार, सुपरवायझर राजेंद्र गोलाईत आणि संबंधित घंटागाडी चालकाविरुद्ध कारवाई करण्यात आली आहे. फिर्यादीनुसार बेवारस मृतदेहाच्या अंत्यविधीसाठी स्वतंत्र वाहनाचा वापर करण्याच्या स्पष्ट लेखी सूचना देण्यात आल्या होत्या. मात्र, त्या आदेशाचे उल्लंघन करून दि. २६ जून २०२६ रोजी ग्रामीण रुग्णालयातील शवविच्छेदन कक्षातून बेवारस मृतदेह घनकचरा संकलनासाठी वापरल्या जाणाऱ्या घंटागाडीतून (एमएच १९-सीएक्स ०६३४) नेण्यात आला. पालिकेची कोणतीही पूर्वपरवानगी न घेता हा प्रकार करण्यात आल्याचा आरोप संबंधितांवर ठेवण्यात आला आहे.

या घटनेनंतर मुख्याधिकारी गणेश शिंदे यांनी संबंधितांविरुद्ध तक्रार दाखल करण्याचे आदेश दिल्यानंतर पोलिसांनी गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे. हवालदार विनोद लक्ष्मण सोनवणे पुढील तपास करीत आहेत. दरम्यान, पालिका प्रशासनाने या प्रकरणाची अंतर्गत चौकशीही पूर्ण केली आहे. मुख्याधिकारी शिंदे यांनी दिलेल्या माहितीनुसार दि. ३ फेब्रुवारी २०२६ च्या आदेशानुसार स्वच्छता निरीक्षक संतोष माणिक यांच्याकडे बेवारस मृतदेहांच्या विल्हेवाटीची जबाबदारी सोपविण्यात आली होती. मात्र, त्यांनी कर्तव्यात कसूर केल्याचा ठपका ठेवत त्यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली होती. त्यांनी सादर केलेला खुलासा असमाधानकारक ठरल्याने त्यांच्या विरोधातील शिस्तभंग कारवाईचा प्रस्ताव सहआयुक्त, नगरपालिका शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय, जळगाव यांच्याकडे पाठविण्यात आला आहे. बेवारस मृतदेहाला सन्मानाने अंत्यसंस्कार मिळावेत, यासाठी असलेल्या नियमांचे उल्लंघन झाल्याने हे प्रकरण राज्यभर चर्चेचा विषय ठरले होते. माध्यमांनी सातत्याने हा मुद्दा उपस्थित केल्यानंतर आता फौजदारी गुन्हा आणि विभागीय कारवाई अशा दोन्ही स्तरांवर हालचाली सुरू झाल्या आहेत. त्यामुळे या प्रकरणात आणखी काही जणांवर कारवाई होण्याची शक्यता व्यक्त होत असून, पुढे कोणावर जबाबदारी निश्चित होते याकडे अमळनेरकरांचे लक्ष लागले आहे.

### आता पाण्याच्या टाक्या साफ न करणाऱ्यांवर गुन्हे दाखल होण्याची प्रतिक्षा...!

**मृतदेहाच्या विल्हेवाटीसंदर्भातील मुख्याधिकाऱ्यांनी कठोर कारवाई केली आहे. आता सुमारे २४ वर्षे पाण्याच्या टाक्या साफ न करता नागरिकांच्या जीवाशी खेळणाऱ्या संबंधित अधिकारी व कर्मचारी यांच्या विरुद्ध मुख्याधिकारी केव्हा गुन्हे दाखल करतात? कोणती कठोर कारवाई करतात? याकडे सर्वांचे लक्ष लागून आहे. दरम्यान याबाबत शविआने मुख्याधिकाऱ्यांना रोखठोक शब्दात सांगितले आहे की, उपनगराध्यक्षांनी जीव धोक्यात घालून सदर प्रकार उघडकीला आणला आहे. त्यांचे प्रयत्न कोणत्याही परिस्थितीत वाया जाता कामा नये. उपनगराध्यक्षांच्या जीवाचे बरे वाईट झाले असते तर त्याला कोण जबाबदार होते? यापुढे टाक्यांची साफसफाई दरवर्षी व्हावी मात्र टाक्यांमध्ये निष्णात व जाणकारांनाच उतरू द्यावे**

## जुलैची सुरूवात सोने, चांदीच्या पडझडीने...

### दर घसरल्याने पहिला दिवस खरेदीदारांसाठी दिलासादायक



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : जळगावच्या सुवर्ण बाजारपेठेत संपूर्ण जून महिना सोने, चांदीच्या दरात मोठे चढ-उतार पाहायला मिळाले. दरम्यान, जुलैतील आज बुधवार, दि. १ जुलै रोजी दोन्ही धातूंच्या दरात मोठी पडझड झाली. बाजारपेठ उघडल्यावर सोन्याच्या दरात १,८५४ रुपयांची घट होऊन ते जीएसटीसह प्रति १० ग्रॅम एक लाख ४४,०९७ रुपयांपर्यंत घसरले. तर चांदीच्या दरात ४,१२० रुपयांची घट नोंदविली गेली. त्यामुळे चांदी जीएसटीसह प्रतिकिलो दोन लाख ३२,७८० रुपयांपर्यंत घसरली. ज्यामुळे जुलैतील पहिला दिवस सोने आणि चांदी खरेदी करणाऱ्यांसाठी दिलासादायक दिसून आला.

मल्टी कमोडिटी एक्सचेंजवरही सुरूवातीच्या व्यवहारात दोन्ही मौल्यवान धातूंच्या किमतीत लक्षणीय घसरण झाली. जागतिक आर्थिक घडामोडी आणि अमेरिकन डॉलरच्या मजबुतीचा थेट परिणाम या घसरणीवर झाल्याचे बाजार विश्लेषकांचे मत आहे. आंतरराष्ट्रीय बाजारात डॉलर निर्देशांक सातत्याने मजबूत होत असून अमेरिकन सरकारी रोख्यांवरील परतावा देखील वाढला आहे. त्याचबरोबर अमेरिकेची मध्यवर्ती बँक फेडरल रिझर्व्ह यंदा आणखी व्याजदर वाढवू शकते, या अपेक्षांमुळे सोन्या-चांदीवरील गुंतवणूकदारांचा कल कमी झाला आहे. परिणामी, या दोन्ही धातूंवर विक्रीचा दबाव वाढला आहे. जूनमध्ये महिनाभर सोन्या-चांदीचे दर घसरत राहिले. त्याच घसरणीचा प्रभाव जुलैच्या सुरूवातीलाही कायम असल्याचे दिसून आले. डॉलर निर्देशांक जूनमध्ये २ टक्क्यांहून अधिक वाढून १०१.३५ च्या आसपास पोहोचल्याने इतर देशांतील खरेदीदारांसाठी सोने आणि चांदी अधिक महाग झाली. त्यामुळे जागतिक मागणीत घट झाल्याचा परिणाम दरावर झाला.

बाजार विश्लेषकांच्या मते सध्या गुंतवणूकदारांचे सर्वाधिक लक्ष अमेरिकेची मध्यवर्ती बँक फेडरल रिझर्व्हच्या आगामी धोरणांवर केंद्रित आहे. अमेरिकेतील महागाई, रोजगाराची स्थिती आणि आर्थिक वाढ यांचा आढावा घेत फेडरल रिझर्व्ह पुढील काही महिन्यांत व्याजदर वाढविण्याचा निर्णय घेऊ शकते, अशी शक्यता वर्तविली जात आहे. विशेषतः सप्टेंबर, ऑक्टोबर आणि डिसेंबरमध्ये होणाऱ्या बैठकीत व्याजदर वाढीचा निर्णय होऊ शकतो, अशी बाजारातील अटकळ आहे. त्यामुळे डॉलर अधिक मजबूत होण्याची शक्यता असून त्याचा दबाव सोने आणि चांदीच्या दरावर कायम राहू शकतो. याशिवाय, २८ आणि २९ जुलै रोजी होणारी फेडरल ओपन मार्केट कमिटी बैठक बाजारासाठी अत्यंत महत्त्वाची मानली जात आहे. या बैठकीत व्याजदरांबाबत कोणता निर्णय घेतला जातो, तसेच फेडरल रिझर्व्हकडून आगामी आर्थिक धोरणाबाबत कोणते संकेत दिले जातात, याकडे जागतिक गुंतवणूकदारांचे बारकाईने लक्ष असेल. जर फेडने व्याजदर वाढीचे संकेत कायम ठेवले, तर डॉलर अधिक मजबूत होऊ शकतो आणि त्याचा परिणाम म्हणून सोने-चांदीच्या दरावर आणखी दबाव येण्याची शक्यता आहे.

# पडीक जमिनीवर रोजगार फुलणार; महिला बचतगटांना जागा मिळणार

### बांबू आणि चारा लागवडीतून मिळणार शाश्वत रोजगार

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

**अमळनेर : राज्याच्या ग्रामीण भागातील महिलांना आर्थिकदृष्ट्या अधिक सक्षम करण्यासाठी शासनाने पाऊल उचलले आहे. आता महिला बचतगट आणि ग्रामसंघांना शासनाच्या पडीक जमिनी नाममात्र एक रुपया दराने भाडेपट्ट्यावर दिल्या जाणार आहेत. या जमिनींवर बांबू व चारा लागवड करून महिलांना हक्काचा रोजगार आणि शाश्वत उत्पन्न मिळविता येणार आहे.**

महिलांच्या सक्षमीकरणासाठी आणि त्यांना रोजगाराच्या नवीन संधी उपलब्ध करून देण्यासाठी राज्य शासनाने ही महत्त्वाकांक्षी योजना आणली आहे. या योजनेचा मुख्य उद्देश ग्रामीण भागातील विनावापर पडून असलेल्या शासकीय जमिनींचा सदुपयोग करणे आणि त्यातून महिला बचतगटांना आर्थिकदृष्ट्या स्वयंपूर्ण बनविणे हा आहे.

यांना १ रुपया भाडेपट्ट्याने पडीक जमिनी

या योजनेंतर्गत जमिनी मिळण्यासाठी नोंदणीकृत महिला बचतगट, आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या विधवा महिलांचे बचतगट (यांना विशेष प्राधान्य). 'उमेद' (महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान) आणि



महिला आर्थिक विकास महामंडळ अंतर्गत येणारे ग्रामसंघांना या योजनेचा लाभ मिळू शकणार आहे.

**बांबू, चारा, लागवडीतून मिळणार उत्पन्न**

मिळालेल्या पडीक जमिनीवर महिलांना बांबू लागवड, चारा निर्मिती किंवा स्थानिक हवामानानुसार फायदेशीर ठरणारी वृक्षलागवड करता येईल. बांबूला सध्या बाजारात मोठी मागणी असून त्यातून थेट आर्थिक उत्पन्न मिळेल; तर चारा लागवडीमुळे पशुपालनाला चालना मिळून दुग्धव्यवसायातूनही दुहेरी फायदा कमावता येईल.

**शासकीय जमिनींचा आढावा घेण्याचे आदेश**

या योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी राज्य शासनाने सर्व जिल्हाधिकारी आणि तहसीलदार यांना त्यांच्या कार्यक्षेत्रातील पडीक आणि विनावापर शासकीय जमिनींचा तत्काळ आढावा घेण्याचे आदेश दिले आहेत. या जमिनींची यादी तयार करून त्या अतिक्रमणामुक्त असल्याची खात्री प्रशासनाला करावी लागणार आहे.

**कोणत्या गटाला किती जमीन मिळणार?**

- १० महिला सदस्य असलेल्या बचत गटांना १ हेक्टर
- २० सदस्य असलेल्या संस्थांना २ हेक्टर

**प्रत्येकी ग्रामसंघाला ५ हेक्टर**

सद्य:स्थिती : जिल्ह्यात ३१ हजार ५५२ स्वयंसहाय्यता समूह आहेत. उमेद अंतर्गत १ लाख ६ हजार महिला लखपती दीदी आहेत. १५ महिला शेतकरी उत्पादक गट आहेत.

संपादकीय

# परीक्षा व्यवस्थेतील निष्काळजीपणा पुन्हा अधोरेखित!

नीट पेपरफुटीच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रातील टीईटी परीक्षेचाही पेपर फुटल्याने सुमारे सहा लाख विद्यार्थ्यांचे भविष्य पुन्हा एकदा टांगणीला लागले आहे. भिवंडी पोलिसांनी रॅकेटचा पर्दाफाश केला असला, तरी परीक्षा व्यवस्थेतील गंभीर त्रुटी आणि निष्काळजीपणा पुन्हा अधोरेखित झाला आहे. 'नीट' परीक्षेचे पेपर फुटल्यानंतर एकीकडे तरुणाईचा संताप देशभरासह दिल्लीतील जंतरमंतरवर कॉक्रोच जनता पार्टीच्या आंदोलनातून आक्रमकपणे व्यक्त होत आहे. दुसरीकडे २८ जूनला महाराष्ट्रात १,०२८ केंद्रांवर होणाऱ्या शिक्षक पात्रता परीक्षेचे (टीईटी) पेपर, परीक्षा सुरू होण्यापूर्वी २४ तास आधी फुटल्याचे उघड झाले. यामुळे सुमारे सहा लाख विद्यार्थ्यांचे भविष्य पुन्हा एकदा अंधारात ढकलले गेले आहे. ही पेपरफुटी उघड झाली भिवंडीत. भिवंडी गुन्हे शाखेच्या पोलिसांनी सापळा रचून बिहारमधील राजीव शॉ, आकाशकुमार आणि हरियाणाच्या धीरज सिंग या तिघांना अटक केली. मुख्य आरोपी अद्याप फरार आहे. या पेपरफुटीचे धागेदोरे दिल्लीपर्यंत पोहोचल्याचे समोर आले आहे, त्यावरून मोठे आंतरराज्य रॅकेट यामागे असणार, हे उघड आहे. आरोपींच्या कबुलीत हा पेपर तब्बल दीड कोटी रुपयांना विकला जाणार होता, असे उघड झाले; म्हणजे आरोपींना रोखले नसते तर टीईटीच्या परीक्षेत कोट्यवधी रुपयांचे गैरव्यवहार झाले असते, यात शंका नाही. आता फेरपरीक्षा तर होईलच, मुख्यमंत्र्यांनी विशेष तपास पथकही स्थापन केले आहे. आरोपींना 'मकोका' लावण्याची चर्चाही सुरू आहे; पण हे सगळे 'बैल गेल्यावर मजबूत झोपा करण्याच्या' बाता मारण्यासारखे आहे. नीट पेपरफुटीचे सावट देशभर असतानाच महाराष्ट्रात हा प्रकार घडावा, हे भयंकर दुर्दैवी आहे.

राज्य सरकारने स्थानिक पातळीवर अधिक सावध राहणे गरजेचे होते, पण यंत्रणा गाफील राहिली. देशातील महत्त्वाच्या परीक्षा यंत्रणा जाग्या होऊन काही धडे घेतील आणि कडेकोट सुरक्षेत परीक्षा होतील, अशी अपेक्षा होती; पण परीक्षेच्या आधी आरोपी विमानप्रवास करून दिल्लीहून थेट ठाण्यापर्यंत तंतोतंत जुळणारा पेपर घेऊन पोहोचत असतील तर नेमकी कडक सुरक्षा कुठे आणि कशी लावली होती, असा प्रश्न पडतो. परीक्षा घेणारी महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद आणि प्रश्नपत्रिका छापणाऱ्या केंद्रांवर सरकारचे कसलेही नियंत्रण नाही, हेच यातून स्पष्ट होते. त्यातही टीईटीबाबत हे पहिल्यांदाच घडलेले नाही! २०२०–२१ दरम्यान झालेल्या टीईटी परीक्षेत मोठ्या प्रमाणावर गैरव्यवहार झाल्याचे पुणे पोलिसांच्या सायबर सेलने उघडकीस आणले होते. त्यावेळी लाखो रुपये घेऊन विद्यार्थ्यांचे गुण वाढविण्यात आले होते. तरीही पुन्हा हे घडले, यातून राज्य परीक्षा परिषदेचे निर्ढावलेपण दिसते. राज्यभरातून सहा लाखांहून अधिक उमेदवारांनी या परीक्षेसाठी अर्ज केला होता. अनेक विद्यार्थी एसटी बस, रेल्वेने प्रवास करून परीक्षा केंद्र असलेल्या शहरांत पोहोचले होते. ऐनवेळी परीक्षा रद्द झाल्याने विद्यार्थ्यांचा वेळ, पैसा वाया गेलाच; पण एकूणच व्यवस्थेबद्दल तीव्र नैराश्य आणि चीड निर्माण झाली. आता फेरपरीक्षेची घोषणा झाली आहे. त्यात महिनाभराचा काळ जाईल, पुन्हा यंत्रणा कामाला लागेल. लोकांच्या करातून आलेला पैसा यंत्रणेच्या ढिसाळ कारभाराची किंमत म्हणून मोजला जाईल.

या घोटाळ्यावरून राज्यात विरोधक, विशेषतः काँग्रेस कमालीची आक्रमक झाली असून राज्याच्या शिक्षणमंत्र्यांच्या राजीनाम्यासाठी आंदोलनांचे सत्र सुरू झाले आहे. विधिमंडळांतही त्यावर वादळी चर्चा झाली. या प्रकरणाच्या सीबीआय चौकशीची मागणीही झाली. लाखो विद्यार्थ्यांचे आयुष्य पणाला लागलेल्या या परीक्षांमधील घोटाळ्यांची जबाबदारी स्वीकारण्याची मानसिकता ना केंद्र सरकारकडे दिसते आहे, ना राज्य सरकारकडे. नीट प्रकरणी केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी पद तर सोडाच, अद्याप मौनही सोडलेले नाही; आता राज्याचे शिक्षणमंत्री दादा भुसे वेगळे पाऊल उचलून संवेदनशीलता दाखवतात का बघायचे. नीट पेपरफुटी, सीबीएसईमधील गोंधळ, नागपूर विद्यापीठातील पेपरफुटी यानंतर आता टीईटी... एकूणच शिक्षण आणि शासकीय परीक्षा यंत्रणांच्या विश्वासार्हतेवर गंभीर प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे. शिक्षक पात्रता परीक्षा ही भावी शिक्षकांची गुणवत्ता तपासण्यासाठी असते. दीड कोटींचा पेपर विकत घेऊन ज्ञानदानाचे पवित्र काम करायला निघालेले हे भावी गुरुजन उद्या आपल्या देशाचे भविष्य घडवणार आहेत! असे शिक्षक शाळांमध्ये रुजू होतील तेव्हा ते पुढच्या पिढीच्या ओंजळीत नेमके काय दर्जाचे ज्ञानकण टाकतील आणि त्यांच्या हातून भावी पिढी कशी घडेल, हा निराश करणारा प्रश्न. या रॅकेटमध्ये परीक्षेचे पेपर दिल्लीहून ठाण्यात घेऊन येणारे या साखळीतले केवळ प्यादे असतील, त्यांचे सूत्रधार, त्यांच्यापर्यंत राज्यातून पोहोचलेले कुणीतरी 'धंदेवाईक' नक्कीच असेल. त्यांच्यापर्यंत तपास यंत्रणा पोहोचतील आणि विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळ करणारे रॅकेट उद्ध्वस्त करण्यात पोलिसांना यश मिळेल, ही आशा. या झाकोळात विद्यार्थ्यांच्या मानगुटीवर पुनःपुन्हा बसणारा पेपरफुटीचा वेताळ दूर व्हावा अन् शिक्षणाचे अवकाश स्वच्छ, मुक्त व्हावे, ही अपेक्षा.

# जुलैपासून १०, २०, ५०, १०० च्या जुन्या नोटा बंद होणार नाहीत

## व्हायरल मेसेजवर बँक ऑफ महाराष्ट्रचा मोठा खुलासा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

गेल्या काही दिवसांपासून सोशल मीडिया आणि काही प्रसारमाध्यमांवर १०, २०, ५० आणि १०० रुपयांच्या जुन्या नोटांविषयी एक खळबळजनक वृत्त वेगाने व्हायरल होत होते. जुलैमध्ये 'बँक ऑफ महाराष्ट्र' या नोटा स्वीकारणे बंद करणार असून देशामध्ये एक प्रकारे छुपी नोटाबंदी लागू होणार आहे, असा दावा या बातम्यांमध्ये केला जात होता. या चर्चेमुळे सामान्य नागरिकांमध्ये संभ्रमाचे आणि चिंतेचे वातावरण निर्माण झाले होते. मात्र, आता स्वतः 'बँक ऑफ महाराष्ट्र'ने पुढे येत या सर्व चर्चांना पूर्णविराम दिला आहे आणि अधिकृत स्पष्टीकरण जारी केले आहे.

**बँकेने काय म्हटले आहे ?**

बँक ऑफ महाराष्ट्रने आपल्या अधिकृत फेसबुक पेजवरून एक प्रसिद्धीपत्रक जारी करत व्हायरल होणारे ते संदेश पूर्णपणे फेक न्यूज असल्याचे जाहीर केले आहे. बँकेने म्हटले आहे, की सोशल मीडियावर एक खोटा मेसेज पसरवला जात आहे. ज्यामध्ये जुलैपासून बँकेच्या शाखांमध्ये २००५ पूर्वीच्या १०, २०, ५० आणि १०० रुपयांच्या नोटा स्वीकारल्या जाणार नाहीत, असा दावा केला आहे. बँक ऑफ महाराष्ट्र हे स्पष्ट करू इच्छिते, की ही माहिती पूर्णपणे चुकीची आणि दिशाभूल करणारी आहे. 'दरम्यान, बँकेने आपल्या ग्राहकांना आणि नागरिकांना आवाहन केले आहे, की अशा कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नका आणि असे मेसेज पुढे फॉरवर्ड किवा शेअर करू नका. कोणत्याही माहितीच्या खात्रीसाठी केवळ बँकेच्या अधिकृत स्रोतांवरच अवलंबून राहावे.

**काय होता व्हायरल झालेला तो दावा?**

व्हायरल झालेल्या वृत्तांमध्ये असा दावा करण्यात आला होता, की बँक ऑफ महाराष्ट्रने आपल्या सर्व शाखांना जुन्या नोटा चलनातून काढून घेण्याचे अंतर्गत आदेश दिले आहेत. तसेच, लवकरच इतर बँका देखील हाच नियम लागू करणार आहेत. ज्यामुळे २००५ पूर्वीच्या महात्मा गांधी मालिकेतील नोटा बाद होतील. परंतु, बँकेच्या खुलाशानंतर हा दावा पूर्णपणे खोटा ठरला आहे. केंद्रीय बँक म्हणजेच 'रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया'ने देखील असा कोणताही आदेश दिलेला नाही, हे आता स्पष्ट झाले आहे.

**रिझर्व्ह बँकेचा मूळ नियम काय सांगतो?**

या गोंधळाच्या पार्श्वभूमीवर रिझर्व्ह बँकेच्या जुन्या नियमाचा संदर्भ घेणे महत्त्वाचे ठरते. २०१५ मध्ये आरबीआयने एका निवेदनात सांगितले होते, की २००५ पूर्वी छापण्यात आलेल्या महात्मा गांधी मालिकेतील नोटा आता बाजारात खूप कमी प्रमाणात शिल्लक राहिल्या आहेत. कोणाकडे या नोटा असतील, तर लोक त्या बँकेत जाऊन बदलून घेऊ शकतात. परंतु 'आरबीआय'ने त्यावेळी हे देखील ठामपणे स्पष्ट केले होते, की या जुन्या नोटा कायदेशीर चलन म्हणून पूर्णपणे वैध राहतील. म्हणजेच या नोटा व्यवहारातून रद्द करण्यात आलेल्या नाहीत. नवीन नोटांमध्ये बनावट नोटांना आळा घालण्यासाठी अधिक प्रगत आणि आधुनिक सुरक्षा वैशिष्ट्ये देण्यात आली आहेत. मध्यवर्ती बँकेने या नोटांवर कधीही बंदी घातलेली नाही. त्यामुळे जुलैपासून नोटा बंद होणार हा सोशल मीडियावरील दावा केवळ एक अफवा आहे.

# शहीद जवानांच्या वारसदारांना मुद्रांक शुल्कातून दिलासा

## महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची माहिती

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

शहीद जवान व अधिकाऱ्यांच्या वीरपत्नी, वीरमाता तसेच कायदेशीर वारसदारांना शेतीसाठी शासकीय जमिनीचे हस्तांतरण करताना यापुढे मुद्रांक शुल्क भरावे लागणार नाही. महसूल विभागाच्या प्रस्तावाला मंत्रिमंडळाने नुकतीच मंजुरी दिली असून हा निर्णय शहीदांच्या कुटुंबियांना मोठा दिलासा देणारा असल्याची माहिती महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली.

महसूलमंत्री बावनकुळे यांनी शनिवार, दि. २७ जून रोजी प्रसारमाध्यमांशी संवाद साधला. यापूर्वी शहीद जवानांच्या कुटुंबियांनाही शासकीय जमिनीच्या हस्तांतरणासाठी मुद्रांक शुल्क भरावे लागत होते. मात्र महसूल विभागाने याबाबत सकारात्मक निर्णय घेतला असून, मंत्रिमंडळाने वीरमाता, वीरपत्नी आणि शहीद कर्मचारी–अधिकाऱ्यांच्या कायदेशीर वारसदारांना मुद्रांक शुल्कातून पूर्ण सवलत देण्यास मान्यता दिली आहे.



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उद्धव ठाकरे यांच्या एकत्र विमान प्रवासाबाबत विचारले असता बावनकुळे म्हणाले, की मुख्यमंत्री फडणवीस यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या आवाहनाला प्रतिसाद देत प्रवासी विमानाने प्रवास करण्याचा आदर्श घालून दिला आहे. उद्धव ठाकरे यांनीही त्याच पद्धतीने प्रवास केल्याबद्दल त्यांनी त्यांचे स्वागत केले. देशहितासाठी घेतलेल्या निर्णयाला सर्वांनी पाठिंबा देणे आवश्यक असल्याचे ते म्हणाले.

विमानातील चर्चेबाबत बोलताना ते म्हणाले, की प्रवासादरम्यान विविध विषयांवर चर्चा होत असते. प्रत्येक वेळी राजकीय चर्चा होतातच असे नाही. इतर प्रवासी उपस्थित असताना राजकीय विषयांवर चर्चा करण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. संजय राऊत यांच्या टीकेवर प्रतिक्रिया देताना बावनकुळे म्हणाले, की संजय राऊत हे आमचे मित्र आहेत. भारतीय जनता पक्षातील माझा ३५ वर्षांचा प्रवास आहे. त्यांनी उपरोधिक भाष्य केले असेल.

राज ठाकरे आणि विश्वास नांगरे–पाटील यांच्या वक्तव्याबाबत ते म्हणाले, की विश्वास नांगरे–पाटील यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाबाबत गौरवोद्गार काढले आहेत. संघाने देशाच्या उभारणीत दिलेल्या योगदानाचा गौरव त्यांनी केला असून त्याकडे वेगळ्या नजरेने पाहण्याची गरज नाही.

उदय सामंत यांच्या सोशल मीडिया स्टेटसबाबत ते म्हणाले, की त्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या असतील. मात्र भाजप आणि शिवसेनेची गेल्या ३० वर्षांची युती अधिक मजबूत असल्याचेच यातून अधोरेखित होते. मुख्यमंत्री फडणवीस यांनी घालून दिलेला आदर्श कार्यकर्त्यांसाठी प्रेरणादायी असल्याचेही त्यांनी सांगितले.

प्रादेशिक परिवहन विभागातील कथित भ्रष्टाचाराबाबत बोलताना बावनकुळे म्हणाले, की या विषयावर परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांच्याशी अनेकदा चर्चा केली आहे. दोषी आढळणाऱ्यां विरोधात गुन्हे दाखल करण्यात येतील. या प्रकरणाची चौकशी केली जाईल.

महसूल विभागातील कथित घोटाळ्याबाबत ते म्हणाले, की काही प्रकरणांमध्ये केवळ तफावत आढळली आहे. महसूल विभागाकडे क्वासी–ज्युडिशियल अधिकार असल्यामुळे मुद्रांक शुल्क वाढविणे किंवा कमी करण्याचे निर्णय घेतले जातात. त्यामुळे प्रत्येक तफावत म्हणजे घोटाळा असे म्हणता येणार नाही. या प्रकरणाच्या तपासासाठी टास्क फोर्स स्थापन करण्यात आली असून तपास सुरू आहे.

# कुवैत, कतार, बहारीनसारख्या देशात रेल्वे का नाही?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

आखाती देश तेल आणि नैसर्गिक गॅसच्या विपुलतेमुळे प्रचंड श्रीमंत आहेत. कुवैत, कतार आणि बहारीन यासारख्या देशांत रुंद, चकाचक, स्वस्त रस्ते, चमचमत्या गगनचुंबी इमारती, अल्ट्रा मॉर्डन फॅसिलिटीज, सर्व काही संपन्नता आणि श्रीमंती वाहवत असते. एवढ्या श्रीमंत देशांतील रस्त्यांवरून आलिशान कार सुसाट धावत असतात. येथे आता फ्लाईंग टॅक्सी देखील येत आहे. मात्र, या देशात रेल्वे का दिसत नाही? काय आहे नेमके कारण?

**रेल्वे नसण्याचे नेमके कारण काय?**

कुवैत, कतार आणि बहारीन यासारख्या देशांत कोणतेही राष्ट्रीय रेल्वेचे नेटवर्क वा लांबपल्ल्याच्या रेल्वे चालविल्या जात नाहीत. याचे मुख्य कारण या देशांचा छोटा भौगोलिक आकार आहे. येथे लोकसंख्या मर्यादित आहे. बहुतांश लोक तेलावर अवलंबून आहेत. देशाचा आकार लहान असल्याने लोक कमी अंतराचा प्रवास करतात. यासाठी येथे शानदार रस्त्यांचे जाळे तयार करण्यात आले आहे. यांच्याकडे प्रचंड धन आणि आधुनिक एक्स्प्रेस वे आहेत. यासाठी व्यक्तीगत कार आणि बसची सेवा मुख्य परिवहनाचे साधन आहे. त्यामुळे लोक कार आणि बसने प्रवास करतात. यामुळे रेल्वे नेटवर्कची गरज फारशी पडत नाही.

लांबपल्ल्याच्या रेल्वे नसूनही या देशांत शहरी परिवहनाला सोपे बनविण्यासाठी एक शानदार मेट्रो नेटवर्क विकसित करण्यात आले आहे. उदाहरणासाठी लांबपल्ल्याच्या रेल्वे नसल्या तरी या देशांनी शहर परिवहनास सोपे बनविण्यासाठी शानदार मेट्रो नेटवर्क विकसित केलेले आहे. उदा.– कतार येथे दोहा मेट्रो यशस्वीपणे सुरू आहे.

**२०३० पर्यंत या देशात रेल्वे धावण्याची आशा**

आखाती देशांत सौदी आणि युएई येथे आधीपासूनच एक रेल्वे नेटवर्क आहे. येथील लोक एका शहरातून दुसऱ्या शहरात जाण्यासाठी हायस्पीड ट्रेन आणि इंटरसिटीचा वापर करतात. आता इतर गल्फ कंट्रींना एकमेकांना जोडण्यासाठी एक नवीन रेल्वे प्रोजेक्ट सुरू करण्याची घोषणा केलेली आहे. याचे नाव जीसीसी (गल्फ को–ऑपरेशन कौन्सील) रेल्वे प्रोजेक्ट आहे. याच प्रकारे कुवैत, कतार, बहारीन, सौदी अरब, संयुक्त अरब अमिराती आणि ओमान यांना परस्परांना जोडण्यासाठी २,११७ किलोमीटर लांबीचे एक विशाल गल्फ रेल्वेची योजनेवर काम सुरू आहे.

# जळगाव जिल्हा नागरी सहकारी बँक असोसिएशनच्या विशेष निमंत्रित संचालकपदी वसुंधराताई लांडगे

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



अमळनेर : येथील खानदेश शिक्षण मंडळाच्या विश्वस्त तथा अमळनेर अर्बन बँकेच्या संचालिका सौ. वसुंधराताई दशरथ लांडगे यांची जळगाव जिल्हा नागरी सहकारी बँक असोसिएशन लिमिटेड, जळगाव येथे विशेष निमंत्रित संचालक म्हणून निवड करण्यात आली आहे. त्यांच्या या निवडीमुळे सहकार व शैक्षणिक क्षेत्रात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

निवडीप्रसंगी असोसिएशनचे अध्यक्ष चंद्रहासभाई गुजराथी, उपाध्यक्ष हेमंत चौधरी यांच्यासह संजय बिर्ला, सतीश मदाने, आरती हुजूरबाजार, श्रीमती. शांताताई वाणी, ॲड. रवींद्र पाचपोहे, सुरेश झोपे, डॉ. नरेंद्र शिरसाठ, ए. टी. महाजन, प्रशांत अग्रवाल आणि देवीदास पाटील उपस्थित होते.

या निवडीबद्दल अमळनेर अर्बन बँकेचे चेअरमन, व्हाईस चेअरमन, संचालक मंडळ, व्यवस्थापक व कर्मचारीवृंद, तसेच खानदेश शिक्षण मंडळ, मराठी वाड्मय मंडळ आणि अमळनेर महिला मंच ट्रस्ट यांनी सौ. लांडगे यांचे अभिनंदन केले. त्यांच्या या उल्लेखनीय निवडीबद्दल विविध सामाजिक, शैक्षणिक व सहकारी क्षेत्रातून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

# पावसात फोन भिजला तर काय कराल? जाणून घ्या स्मार्ट हॅक्स

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

पावसात फोन भिजला तर आपण नेमके काय करायला हवे? हे आपल्याला समजत नसल्याने अनेकदा फोनमध्ये पाणी शिरून तो कायमचा बंद पडण्याची शक्यता असते. त्यामुळे नेमके काय करायला हवे ते जाणून घ्या.

**फोन लगेच बंद करा**

फोन पाण्यातून काढल्या–काढल्या सर्वांत आधी तो स्विच ऑफ करा. जेणे करून शॉर्टसर्किट होणार नाही.

**कोरड्या कापडाने पुसा**

फोनवरील पाणी पुसण्यासाठी सुती कापड किंवा टिश्यू पेपरचा वापर करून तो चांगला कोरडा करा.

**कव्हर आणि सिमकार्ड काढा**

फोनचे कव्हर, सिमकार्ड आणि मेमरी कार्ड लगेच बाहेर काढून वेगवेगळे सुकवायला ठेवा.

**फोन हलवू नका**

फोन जास्त हलवू नका किंवा झटकू नका. यामुळे पाणी आतील भागांमध्ये पसरू शकते.

**हेअर ड्रायर वापरू नका**

फोन सुकवण्यासाठी हेअर ड्रायरचा वापर करू नका. त्याच्या गरम हवेमुळे फोनचे नाजूक पार्टस् वितळू शकतात.

**तांदळाच्या डब्यात ठेवा**

फोन एका डब्यात कोरड्या तांदळामध्ये पूर्णपण बुडवून ठेवा. तांदूळ फोनमधील ओलावा लवकर शोषून घेतो.

**सिलिका जेल पाऊच वापरा**

जर तुमच्याकडे सिलिका जेलचे पाऊच असतील तर फोन त्यांच्यासोबत एका प्लास्टिक पिशवीत बंद करून ठेवा.

**२४ तास चार्जिंग करू नका**

फोन पूर्णपणे सुकल्याशिवाय किमान २४ तास तो अजिबात चार्जिंगला लावू नका किंवा चालू करू नका.




# कारले खाल्ल्याने 'हे' आजार होतात दूर

**जाणून घ्या कडू चवीत दडलेले आरोग्याचे रहस्य !**

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

**औषधी गुणधर्म :** कारले ही एक भाजी आहे जिच्या कडू चवीमुळे केवळ नाव काढताच अनेकजण नाक–तोंड मुरडतात. तरीही, कडूपणा असूनही ती पोषक तत्वे आणि औषधी गुणधर्मांनी समृद्ध मानली जाते.

**गुणकारी :** आयुर्वेदामध्ये तिला आरोग्यासाठी फायदेशीर भाजी मानले जाते आणि अनेक वर्षांपासून पारंपरिक वैद्यकीय पद्धतींमध्ये तिचा वापर केला जात आहे. अनेक आजारांवर ही भाजी गुणकारी मानली जाते.

**पित्त कफ :** कारल्यामुळे शरीरातील 'पित्त' आणि 'कफ' दोष संतुलित राहण्यास मदत होते असे मानले जाते.

**व्हिटॅमिन :** यात व्हिटॅमिन सी, व्हिटॅमिन ए, लोह, पोटॅशियम, फायबर आणि विविध अँटीऑक्सिडंट्स असतात, ज्यामुळे ते संतुलित आहाराचा एक महत्त्वाचा भाग बनते.

**मधुमेहींसाठी फायदेशीर :** मधुमेहाच्या व्यवस्थापनातील संभाव्य फायद्यांमुळे कारल्याची सर्वाधिक चर्चा केली जाते. यात 'कॅरंटिन' (Charantin) आणि 'पॉलिपेप्टाइड–पी' सारखी नैसर्गिक संयुगे जी रक्तातील साखरेची पातळी नियंत्रित करण्यास मदत करू शकतात.

**पाचनसंस्था निरोगी ठेवते :** कारल्यामध्ये फायबर भरपूर प्रमाणात असते, ज्यामुळे पचन सुधारण्यास मदत होते. याचे नियमित आणि संतुलित सेवन बद्धकोष्ठता, गॅस आणि अपचन यांसारख्या समस्या कमी करण्यास मदत करू शकते.

**यकृतासाठी फायदेशीर :** आयुर्वेदामध्ये कारले यकृताच्या आरोग्यासाठी फायदेशीर मानले जाते. शरीरातील विषारी पदार्थ बाहेर टाकण्याच्या नैसर्गिक प्रक्रियेस ते मदत करू शकते.

**वजन कमी करण्यास मदत :** वजन कमी करू इच्छिणाऱ्यांसाठीही कारले उपयुक्त मानले जाते, कारण त्यात कॅलरीज कमी आणि फायबर जास्त असते. यामुळे पोट भरल्यासारखे वाटते, परिणामी वारंवार भूक लागण्याची शक्यता कमी होते.

**रोगप्रतिकारक शक्ती :** कारले व्हिटॅमिन सी आणि अँटीऑक्सिडंट्सने समृद्ध असते, जे शरीराची रोगप्रतिकारक शक्ती मजबूत करण्यास मदत करू शकतात. संतुलित प्रमाणात याचे नियमित सेवन केल्यास शरीराला संसर्गाशी लढण्यास मदत होऊ शकते.

**त्वचेसाठी फायदेशीर :** आयुर्वेदामध्ये कारले त्वचेसाठी फायदेशीर मानले जाते. त्यातील अँटीऑक्सिडंट्स आणि जीवनसत्त्वे त्वचेचे आरोग्य राखण्यास मदत करतात .



हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :– आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7711004040, 7711004242, ई–मेल : globalmahatej@gmail.com



# कोकण सुकन्येची अमेरिकन सैन्य दलात निवड

## प्राजक्ता भांबुरे बोंगाळे हिची मोठी कामगिरी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

लहानपणापासूनच प्राजक्ताने सैन्यात जाण्याचे स्वप्न बाळगले होते. मात्र, एका अपघातामुळे ते अधुरे राहिले. पण तिने जिद्द सोडली नाही. लग्नानंतर अमेरिकेत स्थायिक झाल्यानंतरही तिने आपल्या स्वप्नांवर विश्वास ठेवला आणि त्या स्वप्नांच्या दिशेला तिने मार्गक्रमण केले. अखेर तिचे सैन्यदलात भरती होण्याचे स्वप्न पूर्ण झाले आहे.

लग्नानंतर अमेरिकेत स्थायिक झालेल्या महाराष्ट्रातील रत्नागिरी जिल्ह्यातील दापोली येथील असलेली कोकण सुकन्या प्राजक्ता भांबुरे बोंगाळे हिची आता थेट अमेरिकेच्या सैन्य दलात निवड झाली आहे. प्राजक्ता अमेरिकन सैन्यदलात सध्या मेडिकल विभागात सेवा देत आहेत. या संपूर्ण प्रशिक्षणादरम्यान प्राजक्ता (सारा) बोंगाळे यांनी उत्कृष्ट नेमबाजीसाठी मार्क्समनशिप पदक प्राप्त केले आहे. तसेच संपूर्ण प्रशिक्षण बॅचमध्ये सर्वोच्च शैक्षणिक गुण मिळवून उल्लेखनीय कामगिरी केली आहे. शालेय शिक्षण दापोली येथील ए. जी. हायस्कूल येथे केले. इयत्ता दहावीनंतर

**सक्सेस स्टोरी**

रत्नागिरीच्या गोगटे जोगळेकर महाविद्यालयातून बी.एस्सी. केली. मुंबईतील रूपारेल महाविद्यालयातून तिने इन्कोक्रिनोलॉजी (अंतःस्रावी विज्ञान) या विषयातून तिने एम.एस्सी.पर्यंतचे शिक्षण पूर्ण केले. विवाहानंतर ती अमेरिकेत स्थायिक झाली. अमेरिकन सैन्य दलाचे (यूएस आर्मी) अत्यंत कठीण आणि शारीरिकदृष्ट्या आव्हानात्मक तब्बल आठ महिन्यांचे कठोर प्रशिक्षण यशस्वीरीत्या पूर्ण करून अधिकृतपणे पदवी ग्रहण केली आहे.



### शालेय शिक्षण घेतानाच सैनिक बनण्याचं स्वप्न

प्राजक्ताला लहानपणापासूनच सैन्याविषयी मोठे आकर्षण होते. देशसेवेची भावना व सैन्याच्या गणवेशाविषयी आदर होता. दापोलीमध्ये शालेय शिक्षण घेत असतानाच तिने हे स्वप्न मनात बाळगले होते. परंतु एका अनपेक्षित अपघातामुळे तिला हा विचार बाजूला ठेवावा लागला. सायन्समधून पदव्युत्तर शिक्षण पूर्ण झाल्यानंतर विवाहानंतर अमेरिकेत कौटुंबिक जबाबदारी सांभाळताना तिने आपली आवड आणि करिअरकडेही तितकेच लक्ष दिले.

### खडतर प्रशिक्षण केले पूर्ण

मॉडेलिंग आणि कॅन्सर संशोधन क्षेत्रात कार्यरत असतानाही तिने स्वतःच्या शारीरिक तंदुरुस्तीकडे विशेष लक्ष दिले. नियमित व्यायाम, शिस्तबद्ध दिनचर्या आणि सकारात्मक मानसिकता या बळावर तिने अमेरिकन सैन्याचे ते खडतर प्रशिक्षण केवळ पूर्णच केले नाही तर यशही मोठे यशही मिळवून दाखविले. कुटुंबात सैन्याची कोणतीही पार्श्वभूमी नसतानाही तिचा आजवरचा प्रवास खरोखरच थक्क करणारा आहे.

### मॉडेलिंग क्षेत्रातही कार्य करत किताब मिळविला

प्राजक्ता अमेरिकेत व्यावसायिक क्षेत्रात क्लिनिकल रिसर्च सायंटिस्ट म्हणून कार्यरत होती. तिने आंतरराष्ट्रीय स्तरावर Global Strategic Alliance Millets Ambassador म्हणून जागतिक प्रतिनिधित्वही केले. मॉडेलिंगची आवड असलेल्या प्राजक्ताने सौंदर्य क्षेत्रात USA Mrs. Midwest Universe सारखा प्रतिष्ठेचा किताबही तिने मिळविला. परंतु तिची देशसेवेची जिद्द तिला स्वस्थ बसू देत नव्हती. याच जिद्दी व मेहनतीमुळे तिने मोठे यश मिळविले आहे. प्राजक्ता भांबुरे बोंगाळे यांची अमेरिकन सैन्यात निवड होणे त्यांच्या कुटुंबासाठी आणि दापोलीतल्या लोकांसाठी कोणत्या प्रकारे प्रेरणादायी ठरू शकते, याबाबत तुम्ही तुमचे विचार कमेंट बॉक्समध्ये शेअर करा.

# तरक्की की सबसे बड़ी दुश्मन हैं ये ४ गलत आदतें, समय रहते ही इनसे बना लें दूरी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

विदुर नीति सुविचार २२ जून २०२६: तरक्की की सबसे बड़ी दुश्मन हैं ये ४ गलत आदतें। विदुर नीति के अनुसार, क्रोध, घमंड समेत इन चार गलत आदतों से समय रहते दूरी बना लें। जानिए इन आदतों से कैसे बचें और सफलता की राह आसान करें।

सच्ची तरक्की उन लोगों को मिलती है, जो अपनी आदतों पर नियंत्रण रखते हैं। क्रोध, अति उत्साह, चापलूसी और अहंकार जैसे भाव मनुष्य को अंदर से कमजोर कर देते हैं। २२ जून २०२६ की सुबह का सुविचार हमें बता रहा है कि इन आदतों को पहचाने और इनसे दूरी बना लें, ताकि जीवन में सफलता की राह साफ और मजबूत हो सके।

आचार्य चाणक्य के समकालीन महात्मा विदुर ने महाभारत काल में ऐसी कई नीतियां बताईं, जो आज भी प्रासंगिक हैं। उन्होंने मानव जीवन को प्रभावित करने वाले चार भावों का जिक्र किया है, जो व्यक्ति को उसके लक्ष्य से भटका देते हैं। विदुर नीति में एक श्लोक है-

**क्रोधो हर्षश्च दर्पश्च ह्रीः स्तम्भो मान्यमानिता।**
**यमर्थान्नापकर्षन्ति स वै पण्डित उच्यते ॥**


इसका अर्थ है कि क्रोध, अत्यधिक हर्ष, घमंड और चापलूसी जैसे भाव जो मनुष्य को उसके पुरुषार्थ से दूर ले जाते हैं, उनसे बचने वाला व्यक्ति ही सच्चा बुद्धिमान कहलाता है।

### क्रोध: बुद्धि का सबसे बड़ा शत्रु

क्रोध व्यक्ति को पागल बना देता है। गुस्से में इंसान सही-गलत का फैसला नहीं कर पाता और अक्सर ऐसे काम कर बैठता है, जिनका नतीजा पूरे जीवन तक भुगतना पड़ता है। विदुर कहते हैं कि क्रोध ना सिर्फ रिश्तों को खराब करता है, बल्कि स्वास्थ्य और करियर दोनों को नुकसान पहुंचाता है। क्रोध पर काबू पाने वाला व्यक्ति ही जीवन में स्थिरता पा सकता है।

### अति हर्ष: संतुलन भंग करने वाला भाव

बहुत ज्यादा खुशी या उत्साह भी हानिकारक हो सकता है। अति हर्ष की स्थिति में व्यक्ति



अपनी मानसिक संतुलन खो बैठता है और भावनाओं में बहकर गलत फैसले ले लेता है। विदुर नीति में इसे बुद्धि को भ्रष्ट करने वाला भाव बताया गया है। खुशी मनानी चाहिए, लेकिन उसमें डूबकर अपनी समझदारी नहीं खोनी चाहिए।

### चापलूसी: आत्मसम्मान का दुश्मन

विदुर ह्री (चापलूसी) को भी खतरनाक मानते हैं। चतुर लोग अपना स्वार्थ साधने के लिए खुशामद करते हैं। इससे प्रभावित होकर व्यक्ति गलत रास्ते पर चला जाता है। जो लोग चापलूसी में आ जाते हैं, वे अपना आत्मसम्मान खो बैठते हैं और बाद में पछताते हैं। विदुर सलाह देते हैं कि सच्ची बात सुनने की हिम्मत रखें, भले ही वह कड़वी हो।

### अहंकार: तरक्की का सबसे बड़ा रोड़ा

स्वयं को पूज्य मानने का भाव यानी अहंकार व्यक्ति को अंधा बना देता है। अहंकारी व्यक्ति दूसरों की सलाह नहीं सुनता और अपनी गलतियों को नहीं देख पाता है। विदुर कहते हैं कि अहंकार से व्यक्ति का विकास रुक जाता है। सफलता पाने वाले लोग विनम्र रहते हैं और सीखने के लिए हमेशा तैयार रहते हैं।

# तूप खाल्ल्याने हृदयातील ब्लॉकेज वाढतात का?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

हृदयातील रक्तवाहिन्यांमध्ये कोलेस्टेरॉल, चरबी, दाह आणि इतर पदार्थ साचून प्लाक तयार होतो. या प्रक्रियेला Atherosclerosis म्हणतात. हा प्लाक वाढविल्यास रक्तवाहिन्या अरुंद होतात आणि ब्लॉकेज निर्माण होऊन रक्त पुरवठ्यात अडथळे येऊ शकतात.



तूप खाल्ल्याने हृदयातील ब्लॉकेज थेट वाढतात का? या प्रश्नाचे उत्तर 'हो' किंवा 'नाही' असे देता येत नाही. तूपाचे प्रमाण, एकूण आहार, जीवनशैली आणि व्यक्तीची आरोग्यस्थिती यावर त्याचा परिणाम अवलंबून असतो. संशोधनानुसार मध्यम प्रमाणात तूप खाणे, यामुळे हृदयविकाराचा धोका निर्माण होतो, असे ठोसपणे सिद्ध झालेले नाही. बहुतांश लोकांसाठी तूप पूर्णपणे बंद करण्याची गरज नसते, निरोगी व्यक्तीसाठी दिवसाला १-२ टीस्पून (सुमारे ५-१० ग्रॅम) तूप सामान्यतः सुरक्षित मानले जाते.

अँजिओग्राफीमध्ये ब्लॉकेज आढळल्यास, स्टेंट बसवलेला असेल किंवा हृदयविकाराचा झटका आला असेल, तर तुपाचे प्रमाण ठरविण्यासाठी तज्ज्ञांचा सल्ला घ्यावा.

तुपामुळे ब्लॉकेज थेट वाढतात असे म्हणता येत नाही. परंतु तुपातील संतृप्त चरबीमुळे जास्त प्रमाणात सेवन केल्यास LDL कोलेस्टेरॉल वाढू शकते.

दीर्घकालीन हृदयरोगाचा धोका टाळण्यासाठी प्रमाणात तूप, संतुलित आहार आणि सक्रिय जीवनशैली हेच महत्त्वपूर्ण आहे.

# पुरुष डावा कान का टोचू लागले?

## फॅशन नव्हे, होत आहेत १० आश्चर्यकारक फायदे

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

हल्ली आपण पाहतो, की पुरुष डावा कान टोचतात. त्यात बाली घालतात.

**फायदेशीर शास्त्र**

हा फक्त फॅशनचा भाग नाही तर यामागे एक फायदेशीर शास्त्र आहे.

**कर्णवेध संस्कार**

हिंदू धर्मातील महत्त्वाचा संस्कार पूर्ण होतो.

**नकारात्मकता नाश**


वाईट शक्तींचा प्रभाव पूर्णपणे नष्ट होतो.

**वाईट नजरेपासून रक्षण**

वाईट नजर किंवा दृष्ट लागत नाही.

**आध्यात्मिक कारण**

काही मान्यता आहेत की



यामुळे धन लाभ होतो.

**बुद्धिमत्ता आणि स्मरणशक्ती**

लहान वयात किंवा तरुणाईत कान टोचल्याने एकाग्रता वाढून स्मरणशक्ती दीर्घकाळ टिकते.

**चिंता आणि नैराश्य**

मेंदूतील विशिष्ट मज्जातंतूंवर दाब पडल्यामुळे मानसिक तणाव आणि नैराश्य कमी होते.

# पक्षी घरट्यात सिगारेटचे थोटके का ठेवतात?

## हे कारण वाचून तुम्हाला नक्कीच धक्का बसेल

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

**ब्लू टिट पक्ष्यांचा वेगळा प्रयोग**

शहरांमध्ये तुम्हाला ब्लू टिट पक्षी दिसत असतील. हे पक्षी घरटे बांधताना वापरलेल्या सिगारेटच्या फिल्टरचा वापर करीत असल्याचे आढळले आहे.

**कीटकांपासून संरक्षण**

सिगारेटच्या थोटकामध्ये असलेले निकोटिन आणि इतर रसायनांमुळे टिक, माइट, पिसू यांसारख्या परजीवी कीटकांना लांब ठेवता येते.

**जंगलात वेगळी पद्धत**

नैसर्गिक जंगलांमध्ये हे पक्षी सुंगधी आणि औषधी गुणधर्म असलेल्या वनस्पतींची पाने व फांद्या घरट्यात आणतात.

**शहरी भागातील बदल**


शहरांमध्ये अशा वनस्पती सहज उपलब्ध नसतात. म्हणून पक्ष्यांनी पर्याय म्हणून सिगारेटचे थोटूक वापरायला सुरूवात केली आहे.

**वैज्ञानिकांनी केले दोन प्रयोग**

संशोधकांनी काही नैसर्गिक घरट्यामध्ये सिगारेटचे फिल्टर ठेवले. तर काही ठिकामी कृत्रिम घरटी तयार करून त्यांचा अभ्यास केला.

**पिलांची प्रकृती चांगली आढळली**

सिगारेटचे थोटूक असलेल्या घरट्यांमधील पिलांमध्ये हिमोग्लोबिन आणि इतर आरोग्यदायी घटकांचे प्रमाण तुलनेने चांगले आढळले.



**परजीवींची संख्या कमी**

सिगारेटचे थोटूक असलेल्या घरट्यामध्ये टिक, माइक आणि पिसू यांची संख्या नैसर्गिक घरट्यांच्या तुलनेत कमी होती.

**धोकादायक परिणामांची शक्यता**

सिगारेटच्या फिल्टरमध्ये हजारो विषारी रसायने आणि जड धातू असतात. त्यामुळे जास्त काळ संपर्कात राहिल्यास पक्ष्यांच्या पेशी आणि डीएनएवर वाईट परिणाम होऊ शकतो.

**विनोद** चार्ली चॅप्लिनची नक्कल स्पर्धा

एकदा चार्ली चॅप्लिन यांनी आपल्याच नक्कल स्पर्धेत भाग घेतला.
आणि काय झाले माहीत आहे का?
तो तिसऱ्या क्रमांकावर आला.
(लोकांनी खरे चॅप्लिन आहेत हेच ओळखले नाही.)




शांत - चांगल्या झोपेसाठी चांगला पलंग नव्हे तर चांगली गादी आवश्यक आहे.
सर्वोत्तम क्वालिटीच्या गादी साठी



एकमेव ४५ वर्षांचा समृद्ध अनुभव असलेले शोरुम

सीमा हॅण्डलूम हॉउस पारोला रोड, धुळे






# परमात्मा श्रीपाद श्रीवल्लभ कुरवपूर

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

आपण सर्वजण आपल्या मनाप्रमाणे जीवन जगतो. प्रत्येक निर्णय घेताना, प्रत्येक कर्म करताना आपण स्वतःच्या इच्छा, अपेक्षा आणि स्वार्थाचा विचार करतो. आपल्याला जे योग्य वाटते तेच करतो, जसे आवडते तसे करतो. पण अशा पद्धतीने जीवन जगत असताना स्वतःला कधी एक प्रश्न विचारला आहे का? आपण जे जीवन जगत आहेत ते श्रीपाद श्रीवल्लभ प्रभूंना पसंद पडेल असे आहे का?

जेव्हा जीवनात दुःख येते, संकटे येतात, अडचणींचे डोंगर उभे राहतात तेव्हा मात्र आपण कुरवपूरला धाव घेतो. प्रभूंच्या चरणी जाऊन म्हणतो, "प्रभू, माझी ही इच्छा पूर्ण करा... माझे हे संकट दूर करा... माझ्या समस्या सोडवा. पण कधी विचार केला का, की आपण श्रीपाद प्रभूंसाठी काय केले आहे किंवा त्याच्यासाठी काय करत आहोत?



त्याच्या इच्छेविरुद्ध आपण जीवन जगत असतो. त्यांचे स्मरणही करायचे अनेकदा विसरून जातो, त्यांना आवडणारे आचरण आपण करावे, असा कधी मनात सुद्धा विचार येत नाही. मग त्यांच्याकडून आपल्या इच्छा पूर्ण करण्याची अपेक्षा कशी ठेवू शकतो? आपण त्याचे ऐकत नाही, त्याच्या मनाला बरे वाटेल असे कर्म करत नाही. मग त्यांनी आपल्या प्रत्येक इच्छेला, प्रत्येक भावनेला का प्रतिसाद द्यावा? परमेश्वराला शब्दांनी नव्हे; तर आपल्या आचरणाने प्रसन्न होतो, त्यांना आवडणारे जीवन म्हणजे सत्य, दया, प्रेम, नम्रता, सेवा, नामस्मरण, सदाचार आणि धर्म यांचा स्वीकार करून या मार्गावर चालायला सुरूवात करतो तेव्हा आपण श्रीपाद प्रभूंच्या अधिक जवळ जातो. आपण जर आपल्या प्रत्येक कर्मात श्रीपाद प्रभूंना स्थान दिले, प्रत्येक निर्णय त्यांच्या इच्छेनुसार घेण्याचा प्रयत्न केला, तर आपल्या जीवनाची जबाबदारीही त्यांच्या चरणी अर्पण करतो. मग आपल्या जीवनातील प्रत्येक अडचण ही फक्त आपली राहत नाही, ती श्रीपाद प्रभूंचीही होते आणि ज्या भक्ताची जबाबदारी प्रभू स्वतः स्वीकारतात, त्याला कोणत्याही संकटाची भीती राहत नाही.

आपले काम फक्त एवढेच आहे, की प्रभूंना आवडणारे जीवन जगण्याचा प्रामाणिक प्रयत्न करणे. बाकी आपल्या जीवनाचे नियोजन, संरक्षण आणि कल्याण हे श्रीपाद प्रभू स्वतः करतात. अशा भक्ताला कुरवपूरमध्ये जाऊन प्रभूंना भेटण्याची गरज नाही. कारण श्रीपाद श्रीवल्लभ प्रभू त्याच्या प्रत्येक पावलावर त्याच्यासोबत उभे असतात. म्हणून श्रीपाद प्रभूंकडे इच्छा मागण्यापूर्वी स्वतःला बदला. प्रभूंना आवडणारे विचार, आचार आणि व्यवहार स्वीकारा. जेव्हा आपले जीवनच प्रभूंना अर्पण होईल तेव्हा त्यांच्या कृपेचा वर्षाव आपोआप सुरू होईल. ते आपल्या हातावरील फोडाप्रमाणे आपली काळजी घेतील, प्रत्येक संकटातून मार्ग काढतील आणि आपल्या जीवनाला योग्य दिशा देतील.

आजपासून फक्त श्रीपाद श्रीवल्लभ प्रभूंकडे मागणे नव्हे, तर त्यांना आवडणारे जीवन जगण्याचा संकल्प करूया. कारण जेथे समर्पण असते, तेथेच प्रभूंची अखंड कृपा असते.

**॥ श्रीपाद श्रीवल्लभ प्रसन्न ॥**

# श्री पांडुरंग म्हणजे कोण?
## त्यांना श्री विठ्ठल नावाने का ओळखतात?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

श्री पांडुरंग म्हणजे कोण? व त्यांची उत्पत्ती याची आख्यायिका काय आहे? व त्यांना श्री विठ्ठल म्हणून या नावाने का ओळखले जाते? श्री विठ्ठल (पांडुरंग) हे महाराष्ट्राचे आराध्य दैवत आणि वारकरी संप्रदायाचे प्रमुख श्रद्धास्थान आहेत. ते भगवान विष्णू किंवा श्रीकृष्ण यांचाच एक अवतार आहे. श्री विठ्ठलांच्या हातात शस्त्र नाहीत, ते कमरेवर हात ठेवून विटेवर शांत उभे आहेत.

### श्री विठ्ठल कोण आहेत?

विठ्ठल हे भक्तांच्या प्रेमासाठी धावून येणारे आणि भक्तांचे कैवारी आहेत. विठ्ठल शब्दाचा अर्थ 'विटेवर उभा असलेला' असा होतो. त्यांच्या डाव्या बाजूला रुक्मिणी (रखुमाई) आहेत.

### श्री विठ्ठलांचा अवतार/ प्रकट होण्याची कथा

श्री विठ्ठल यांचा जन्म इतर अवतारांसारखा नाही. त्यांची पौराणिक कथा अशी आहे, की भक्त पुंडलिक हे भगवान श्रीकृष्णांचे एक महान भक्त होते. ते आपल्या वृद्ध आई-वडिलांची अत्यंत निष्ठेने सेवा करत.



### श्रीकृष्णांचे आगमन

भक्त पुंडलिकांच्या या मातृ-पितृ भक्तीची परीक्षा घेण्यासाठी आणि त्यांना दर्शन देण्यासाठी भगवान श्रीकृष्ण स्वतः द्वारकेहून पंढरपूरला (दिंडीर वनात) आले.

### विटेवर उभे राहणे

जेव्हा भगवान श्रीकृष्ण श्री पुंडलिकांच्या घरी पोहोचले तेव्हा पुंडलिक आपल्या आई-वडिलांची सेवा करण्यात मग्न होते. त्यांनी आलेल्या भगवंतांकडे लगेच लक्ष दिले नाही. उलट त्यांना बसण्यासाठी एक वीट (वीट) मागे फेकून भगवंतांना त्यावर उभे राहण्यास सांगितले.

### प्रतीक्षा

भक्त पुंडलिकाच्या सेवेचा आदर करत भगवंत त्या विटेवर कंबरेवर हात ठेवून उभे राहिले. पुंडलिकांनी आई-वडिलांची सेवा पूर्ण केल्यावर देवाची क्षमा मागितली आणि प्रार्थना केली, की भक्तांच्या कल्याणासाठी तुम्ही कायमचे या विटेवर येथेच उभे राहा. तेव्हापासून भगवंत 'विठ्ठल' रूपात युगे-अठ्ठावीस विटेवर उभे आहेत.

### वारकरी संप्रदाय

संत ज्ञानेश्वर, संत नामदेव, संत एकनाथ आणि संत तुकाराम यांसारख्या संतांनी विठ्ठल भक्तीचा प्रसार केला. पंढरपूरमध्ये आषाढी एकादशीला लाखो वारकरी एकत्र येतात.

# वारी म्हणजे काय?
## पंढरीची वारी कशी सुरू झाली?



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

वारकरी संप्रदायाचे मूळ प्रणेते श्री संत ज्ञानेश्वर माऊलींचे वडील श्री विठ्ठलपंत महाराज हे आषाढ वारी करत असत. त्यानंतर माऊलींनी आणि त्यांच्या भावंडांनी ही परंपरा कायम ठेवली. पंढरपूरपर्यंत केलेली पदयात्रा होय.

आषाढी वारी (पंढरपूर) म्हणजे वारकरी भक्तांनी आषाढी एकादशीनिमित्त महाराष्ट्रातील विविध गावांपासून सुरू होऊन पंढरपूरपर्यंत केलेली पदयात्रा होय. ही एक पवित्र तीर्थयात्रा आहे.

वारी ही महाराष्ट्रातील वारकरी संप्रदायाची अत्यंत पवित्र आणि श्रद्धेने परिपूर्ण यात्रा आहे. दरवर्षी आषाढी एकादशीला पंढरपूरच्या विठोबाच्या दर्शनासाठी हजारो भक्त पायी चालत ही वारी करतात. 'वारी' या शब्दाचा उगम 'वार' या शब्दातून झाला असून, त्याचा अर्थ एखादी गोष्ट नियमितपणे आणि सतत घडणे, असा होतो. त्यामुळे 'वारी' म्हणजे देवदर्शनासाठी नियमितपणे पंढरपूरला जाणे.

वारी ही महाराष्ट्रातील एक धार्मिक व सांस्कृतिक परंपरा आहे. ही वारी आषाढी महिन्यातील शुद्ध एकादशीला होते.

### वारकरी महावाक्य

वारकरी धर्मात कोणत्याही कार्याची सुरूवात करताना 'पुंडलिक 'वरदा हरी विठ्ठल, श्री ज्ञानदेव तुकाराम, पंढरीनाथ महाराज की जय!' असा जयघोष केला जातो. स्थानपरत्वे या जयघोषात 'पंढरीनाथ भगवान की जय' असा भेद आढळतो. अनेक ठिकाणी 'माऊली ज्ञानेश्वर महाराजकी जय', 'जगद्गुरू तुकाराम महाराज की जय', 'शान्तिब्रह्म एकनाथ महाराज की जय' अशी विविधता आढळते. या जयघोषाला वारकरी महावाक्य किंवा वारकरी महाघोष म्हटले जाते.

'पंढरीचा वास, चंद्रभागेस्नान, आणिक दर्शन विठोबाचे' या इच्छेपोटी वारकरी वारी चुकवत नाहीत, अशी भागवत संप्रदायाची धारणा आहे. त्यामुळेच आषाढी वारी ही प्रत्येक वारकरी महिला-पुरुषांच्या मनात आदराचे आणि श्रद्धेचे स्थान बाळगून आहे, असे मानले जाते.

वारी ही केवळ देवदर्शनासाठीची यात्रा नाही, तर ती भक्ती, सेवा, शिस्त, समर्पण, समता आणि आनंद साजरा करण्याचा एक महाउत्सव आहे. म्हणूनच वारीला 'सोहळा' असे संबोधले जाते. लाखो लोकांचे एकत्र येणे, त्यांचे परस्पर सहकार्य, भावनिक एकता आणि हरिपाठ यामुळे वारीचा अनुभव भक्तांसाठी आयुष्यभर लक्षात राहणारा ठरतो.

# 'भिऊ नकोस मी तुझ्या पाठीशी आहे'

### जीवन परिचय

**जन्म :** इ. स १८५८ च्या सुमारास
**स्थान :** अक्कलकोट, महाराष्ट्र
**स्वरूप :** दिगंबर अवधूत
**गुरू तत्त्व :** श्री दत्तात्रेयांचे अवतार

### प्रकट दिन

शके १७४९ वैशाख शुद्ध चतुर्दशी ( इ.स १८५७ च्या सुमारास)

### स्वामींचे स्वरूप

- दिगंबर
- भस्म लेपित शरीर
- हातात कमंडलू
- कर्णफुले
- रुद्राक्ष माळा
- तेजस्वी डोळे

### स्वामींचा संदेश

१. श्रद्धा आणि सबुरी ठेवा.
२. सत्कर्म करा आणि नामस्मरण करा.
३. सर्व जीवांमध्ये देव पाहा.
४. अहंकार त्यागा, सेवा करा.
५. गुरूवर विश्वास ठेवा, तेच तारक आहेत.

### दैनिक साधना

- स्वामींचे नामस्मरण करा.
- ग्रंथ वाचन (स्वामी चरित्र सारामृत)
- स्वामींची आरती करा.
- भक्तांची सेवा आणि मदत करा.
- सात्त्विक आहार आणि विचार ठेवा.

### ज्ञान आणि वैराग्य

संसारात राहूनही अलिप्त राहण्याची शिकवण

### करुणा आणि कृपा

भक्तांच्या दुःखात नेहमी धावून येणारे

### सर्वज्ञता

भक्तांच्या मनातील विचार ओळखणारे

### अंतर्ज्ञान

भविष्याची अचूक जाणिवा देणारे


### स्वामींच्या शिकवणीची तत्त्वे ✻

**श्रद्धा**
पूर्ण विश्वास ठेवा

**सबुरी**
धीर धरा, घाई करू नका

**सेवा**
निःस्वार्थ सेवा करा

**नामस्मरण**
नियमित जप आणि ध्यान करा



### वैराग्य

मोह-माया त्यागून सत्याचा स्वीकार करा

### स्वामी समर्थ आरती

**जय देव जय देव जय श्री स्वामी समर्थ।**
**आरती ओवाळुनी तुज मन कांहीची ॥**
**जय देव जय देव...**
**कर्पूरगौरं करुणावतारं संसारसारं।**
**भवसागर तारकं श्रीगुरुदेव दत्त ॥**
**जय देव जय देव...**
**। अक्कलकोटी स्वामी समर्थ महाराज की जय।**

**॥ स्वामी समर्थ ॥**
भक्तांनो, स्वामींचे नाम घ्या, चिंतामुक्त व्हा आणि आनंदी जीवन जगा.

### स्वामींच्या चरणी कसे शरण जावे ?

- अहंकार त्यागून शरण जा.
- स्वामींवर पूर्ण विश्वास ठेवा.
- नियमित साधना आणि नामस्मरण करा.
- सत्कर्म आणि सेवा करा.
- स्वामी सर्व आपले कार्य करतील.

### स्वामींची प्रमुख स्थाने

- अक्कलकोट
- गाणगापूर
- औदुंबर
- नरसिंहवाडी
- पंढरपूर

# दत्तभक्तीचा महामंत्र : 'दिगंबरा दिगंबरा श्रीपादवल्लभ दिगंबरा' मंत्राचा आध्यात्मिक अर्थ!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

महाराष्ट्र, कर्नाटक, आंध्र प्रदेश आणि संपूर्ण भारतात दत्त संप्रदायाला एक मोठी आणि प्राचीन परंपरा लाभली आहे. अवधूत चिंतन श्री गुरुदेव दत्त, श्री स्वामी समर्थ, किंवा अलख निरंजन अशा अनेक जयघोषांनी दत्तभक्तांचे हृदय प्रफुल्लित होते. परंतु, या सर्व जयघोषांमध्ये आणि मंत्रांमध्ये 'दिगंबरा दिगंबरा श्रीपादवल्लभ दिगंबरा' या मंत्राचे स्थान अत्यंत अढळ, वंदनीय आणि चमत्कारी मानले गेले आहे. हा केवळ चौदा अक्षरांचा एक नामजप किंवा मंत्र नाही, तर तो मानवी जीवनाचा उद्धार करणारा एक महान आध्यात्मिक महामार्ग आहे.

दत्त संप्रदायाचे आद्य अवतार मानले गेलेले श्रीपाद श्रीवल्लभ (पीठापूर) यांच्या रूपाशी आणि दत्तप्रभूंशी जोडलेला हा मंत्र वरवर पाहता अत्यंत साधा आणि सुलभ वाटतो. सामान्य भाविक हा मंत्र देवाचे नाव म्हणून आवडीने, श्रद्धेने म्हणतो. परंतु, जेव्हा आपण या मंत्राच्या अंतरंगात प्रवेश करतो, तेव्हा लक्षात येते की यात संपूर्ण वेदान्त, उपनिषदांचे सार आणि मानवी मनाचा मोक्षापर्यंतचा प्रवास अत्यंत सुंदर रीतीने गुंफला आहे. प्रस्तुत लेखात आपण या मंत्राच्या चारही भागांचा (पहिला दिगंबरा, दुसरा दिगंबरा, श्रीपादवल्लभ आणि चौथा दिगंबरा) अत्यंत विस्तारपूर्वक आणि तात्विक अभ्यास करणार आहोत.

मंत्राची सुरूवात 'दिगंबरा' या शब्दाने होते. 'दिगंबर' या शब्दाची जर आपण फोड केली, तर 'दिक् + अंबर' असा संधी होतो. 'दिक्' म्हणजे दिशा आणि 'अंबर' म्हणजे वस्त्र. ज्याने दिशांनाच आपले वस्त्र मानले आहे, जो नग्न आहे, ज्याला कशाचेही आवरण नाही, तो दिगंबर.

"पहिल्या दिगंबरा या शब्दाने त्या शुद्ध अहम्‌ला हाक मारली आहे. तो आत्मा म्हणजे शुद्ध अहम्. तो साक्षी आहे. निर्विकार आहे. अनंदरूप आहे."

सामान्यतः माणूस या जगात जगत असताना स्वतःची ओळख कशी करून देतो? "मी अमुक अमुक आहे, मी डॉक्टर आहे, मी इंजिनिअर आहे, मी गरीब आहे, मी श्रीमंत आहे, मी काळा आहे, मी गोरा आहे." ही झाली शरीराची आणि उपाधींची ओळख. पण अध्यात्म सांगते की, हे शरीर म्हणजे तुम्ही नाही. शरीर तर आज आहे आणि उद्या मातीत मिसळणार आहे. मग 'खरा मी' कोण?

पहिला 'दिगंबरा' शब्द आपल्याला याच प्रश्नाचे उत्तर शोधायला लावतो. तो आपल्याला सांगतो की, आपल्या या नश्वर शरीराच्या आत एक अविनाशी तत्त्व राहते, त्याला आपण 'आत्मा' म्हणतो. हा आत्मा कसा आहे?

तो साक्षी आहेः तो तुमच्या आयुष्यातील चांगल्या-वाईट घटना फक्त पाहतो, त्यात अडकत नाही.

**तो निर्विकार आहेः** शरीराला रोग होतो, मनाला दुःख होते, पण आत्म्याला कोणताही विकार शिवत नाही.

**तो अनंदरूप आहेः** त्याला कशाचीही गरज नाही, तो स्वतःमध्येच पूर्ण आणि आनंदी आहे.

पहिला 'दिगंबरा' शब्द म्हणताना साधकाने स्वतःच्या शरीराचा, नावाचा आणि रूपाचा विसर पाडून, आपल्या आत असलेल्या त्या 'शुद्ध अहम्' (मी आहे ही जाणीव) म्हणजेच आत्म्याला हाक मारायची असते. हा स्वतःच्या खऱ्या रूपाचा शोध घेण्याचा पहिला टप्पा आहे.

जेव्हा साधकाला पहिल्या शब्दाने स्वतःच्या आत्म्याची जाणीव होते, तेव्हा त्याच्या मनात दुसरा प्रश्न निर्माण होतो "माझा शोध तर लागला, पण माझ्या सभोवताली जे एवढे मोठे विश्व दिसत आहे, ते काय आहे? हे जग कुठून आले?" या दुसऱ्या प्रश्नाचे उत्तर आपल्याला मंत्रातील दुसऱ्या 'दिगंबरा' या शब्दात मिळते.

**"दुसऱ्या दिगंबरा या शब्दाने परब्रम्हाचे अनुसंधान केले आहे. आपल्या भोवती जे सर्वही विश्व दिसते आहे ते केवळ भासणारे आहे. वस्तुतः ते सर्व एकमेव भगवंतच आहे..."**



भारतीय तत्त्वज्ञानात, विशेषतः आदि शंकराचार्यांच्या अद्वैत वेदांतात 'ब्रह्म सत्यं जगन्मिथ्या' असे म्हटले आहे. याचा अर्थ असा नाही की हे जग अस्तित्वातच नाही. तर याचा अर्थ असा आहे की, हे जग जसे दिसते तसे कायम टिकणारे नाही, ते बदलणारे आहे. जसे सोन्यापासून अनेक प्रकारचे दागिने (अंगठी, गळपट्टी, बांगड्या) बनवले जातात. नावे वेगवेगळी असली तरी मूळ तत्त्व 'सोने' हे एकच असते. तसेच, या जगात कोट्यवधी जीव आहेत, डोंगर, नद्या, सूर्य, चंद्र आहेत; पण या सर्वांच्या मागे, या सर्वांना चालवणारी जी एकच मूळ महाशक्ती आहे, तिला 'परब्रह्म' म्हणतात.

दुसऱ्या 'दिगंबरा' शब्दाचा उच्चार करताना साधक आपल्या डोळ्यांना दिसणाऱ्या या अथांग विश्वाकडे पाहतो आणि समजून घेतो की, "हे जे काही मला दिसत आहे, ते सर्व त्या एकाच परमेश्वराचे रूप आहे. झाडात तोच आहे, प्राण्यात तोच आहे, माझ्या शत्रूत आणि मित्रातही तोच आहे." या जाणिवेमुळे साधकाच्या मनातील भेदभावाची भावना नष्ट होते. संपूर्ण विश्वाला परमेश्वर मानून त्या विराट परब्रह्माला मारलेली साद म्हणजे दुसरा 'दिगंबरा' शब्द होय.

पहिली दोन चरणे (आत्मतत्त्व आणि परब्रह्मतत्त्व) अत्यंत गूढ आणि बुद्धीच्या पलीकडची आहेत. सर्वसामान्य माणसाला 'निराकार आत्मा' किंवा 'अथांग परब्रह्म' यावर लक्ष केंद्रित करणे खूप कठीण जाते. मानवी मनाला एकाग्र होण्यासाठी एका आधाराची, एका सुंदर रूपाची गरज असते. ती गरज मंत्रातील तिसरा शब्द पूर्ण करतो, तो म्हणजे 'श्रीपादवल्लभ'.

"श्रीपादवल्लभ भगवंताचे सगुण साकार रूप आहेत. ते भगवंताचेच अवतार आहेत. त्यांना संबोधन केले आहे."

दत्त संप्रदायात कलियुगातील पहिला अवतार म्हणजे 'श्रीपाद श्रीवल्लभ' होय. त्यांचा जन्म आंध्रप्रदेशातील पीठापूर येथे झाला होता. ते साक्षात दत्तप्रभूंचे सगुण रूप होते.

'श्री' म्हणजे लक्ष्मी, ऐश्वर्य, शोभा आणि शक्ती.
'पाद' म्हणजे चरण किंवा पाऊल.
'वल्लभ' म्हणजे स्वामी किंवा पती.

ज्यांच्या चरणांमध्ये संपूर्ण विश्वाचे ऐश्वर्य, शांतता आणि ज्ञान वास करते, ते म्हणजे श्रीपादवल्लभ. जेव्हा आपण 'श्रीपादवल्लभ' हा शब्द उच्चारतो, तेव्हा आपल्या डोळ्यांसमोर दत्तगुरूंचे ते अत्यंत तेजस्वी, हातात जपमाळ, कमंडलू धारण केलेले, पाठीमागे कामधेनु आणि चार वेद (चार कुत्रे) असलेले सगुण रूप उभे राहते.

हा शब्द भक्तीचा मार्ग दाखवतो. ज्ञानमार्गाने जे परब्रह्म समजायला कठीण होते, तेच परब्रह्म श्रीपादवल्लभांच्या रूपाने आपल्यासाठी सोपे आणि सुलभ होते. "हे देवा, तुम्ही कितीही मोठे, निराकार असलात, तरी माझ्यासाठी तुम्ही माझे गुरु, माझे माता-पिता श्रीपादवल्लभ आहात," हा शरणागतीचा भाव या तिसऱ्या शब्दात आहे.

आता साधकाने स्वतःला ओळखले (पहिला दिगंबरा), विश्वातील देवाला ओळखले (दुसरा दिगंबरा), आणि देवाच्या सगुण रूपावर प्रेम केले (श्रीपादवल्लभ). आता शेवटचा टप्पा येतो तो म्हणजे 'प्रार्थनेचा' आणि 'एकतेचा'. म्हणूनच शेवटचा शब्द पुन्हा येतो 'दिगंबरा'.

"माझ्यातील सर्व विकार नाहीसे करा. मला लवकर आपल्या जवळ न्या. आपले स्वरुप मला प्राप्त होऊ दया... अहं ब्रम्हास्मि हा अनुभव मला येऊ दया."

हा चौथा 'दिगंबरा' शब्द म्हणजे जीवात्म्याने शिवात्म्याकडे केलेली आर्त हाक आहे. यात साधक दत्तगुरूंना म्हणतोः

**१) विकारांचा नाश :** "हे गुरुदेवा, माझ्या मनात अजूनही काम, क्रोध, लोभ, मोह, मद आणि मत्सर हे विकार आहेत. जोपर्यंत हे विकार आहेत, तोपर्यंत मी मुक्त होऊ शकत नाही. कृपया माझे हे विकार नष्ट करा."

**२) भ्रमाचा निरसण :** "मला रोज सकाळी उठल्यावर वाटते की मी केवळ हा देह आहे, मला भूक लागते, मी मरेन, मी जन्मेन. हा माझा 'देहभ्रम' आहे. हा भ्रम तुमच्या कृपेने दूर करा."

**३) अहं ब्रह्मास्मि (मीच ब्रह्म आहे):** हा उपनिषदांमधील महामंत्र आहे. साधक शेवटी अशी प्रार्थना करतो की, "हे श्रीपादवल्लभ, तुमच्यात आणि माझ्यात कोणताही फरक राहू नये. जसा पाण्याचा थेंब समुद्रात पडल्यावर तो थेंब राहत नाही तर स्वतः समुद्र बनून जातो, तसा मी तुमच्यात मिसळून जावा. मला 'मीच ब्रह्म आहे' (अहं ब्रह्मास्मि) हा प्रत्यक्ष अनुभव येऊ द्या."

चौथ्या 'दिगंबरा' शब्दाने साधक स्वतःसाठी तीच 'दिगंबर अवस्था' मागतो, जी दत्तगुरूंची आहे. दिगंबर अवस्था म्हणजे कपडे नसणे नव्हे, तर सर्व प्रकारच्या मोहांचे, आशा-आकांक्षांचे आणि अज्ञानाचे आवरण फाडून पूर्णपणे मुक्त होणे होय.

हा मंत्र म्हणताना साधक आधी स्वतःच्या आत डोकावतो, मग विश्वाकडे पाहतो, मग गुरूंचे ध्यान करतो आणि शेवटी गुरूंमध्येच विलीन होऊन जातो. यापेक्षा सोपी आणि सुंदर आध्यात्मिक प्रक्रिया दुसरी कोणती असू शकते?

अनेकदा लोकांना वाटते की असे आध्यात्मिक विचार फक्त संन्याशांसाठी किंवा वयोवृद्धांसाठी असतात. पण हा गैरसमज आहे. 'दिगंबरा दिगंबरा श्रीपादवल्लभ दिगंबरा' या मंत्राचा दैनंदिन जीवनात वापर केल्यास माणसाला अनेक मानसिक आणि शारीरिक लाभ होतात.

**मानसिक शांतता आणि तणावमुक्ती :** आजच्या धावपळीच्या युगात माणसाला प्रचंड तणाव आहे. जेव्हा आपण या मंत्राचा संथ गतीने जप करतो, तेव्हा आपल्या मेंदूतील लहरी शांत होतात. "मी म्हणजे केवळ हे शरीर नाही," हा विचार मनात आल्यावर संकटांची भीती कमी होते.

**अहंकाराचा नाश :** या मंत्रात जगाला परब्रह्म मानले आहे. जेव्हा आपण समोरच्या व्यक्तीमध्येही देवाचे रूप पाहतो, तेव्हा आपल्यातील अहंकार, राग आणि द्वेष गळून पडतात. यामुळे कौटुंबिक आणि सामाजिक संबंध सुधारतात.

**एकाग्रता वाढणे :** विद्यार्थ्यांसाठी आणि काम करणाऱ्या लोकांसाठी हा जप एकाग्रता वाढविण्यास मदत करतो. श्रीपादवल्लभ हे ज्ञानाचे देव आहेत, त्यांच्या स्मरणाने बुद्धी सात्त्विक आणि तीव्र होते.

**सकारात्मक ऊर्जा :** या मंत्राच्या उच्चारणाने निर्माण होणारी कंपने वास्तूतील आणि शरीरातील नकारात्मक ऊर्जा दूर करतात आणि सकारात्मकतेचा संचार करतात. 'दिगंबरा दिगंबरा श्रीपादवल्लभ दिगंबरा' हा केवळ नामस्मरण करण्याचा मंत्र नाही, तर ते एक 'जीवन जगण्याचे शास्त्र' आहे. तो आपल्याला संकुचित वृत्तीकडून विशालतेकडे आणि अज्ञानाकडून प्रकाशाकडे घेऊन जातो.

**॥ दिगंबरा दिगंबरा श्रीपदवल्लभ दिगंबरा ॥**

**(वरील माहिती विविध धर्मग्रंथांतून संकलीत केली आहे.)**